गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे शहर.

ठाणे शहर मुख्यालय पोलीस परेड मैदानाजवळ, उर्जिता
हॉटेलसमोर , कोर्ट नाका, ठाणे.
दुरध्वनी क्रमांक– 7400200493
Email - ***cp.thane.thanecrime@mahapolice.gov.in***

प्रेस नोट दिनांक : ०७/०५/२०२५

‘‘ मोबाईल फोन क्रमांकांचा डाटा (C.D.R./S.D.R./Location) चोरी करून विकणाऱ्या दोन पोलीसांसह एका खाजगी इसमास अटक ’’

प्राप्त गोपनीय माहितीवरून, सायबर पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे नेमणुकीत असलेले पो. शि./३८१६ आकाश सोपान सुर्वे आणि पो.शि./१०१८ हर्षद लक्ष्मण परब या दोन पोलीस अंमलदारांनी त्यांच्या स्वत:च्या आर्थिक फायद्याकरिता ते लोकसेवक म्हणून करीत असलेल्या कर्तव्याचा गैरवापर करून मोबाईल फोन क्रमांकांचा डाटा (C.D.R./S.D.R./Location) चोरून तो डाटा मोहम्मद सोहेल राजपुत या सराईत गुन्हेगारास विक्री करत असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर प्रकरणाची मा. पोलीस आयुक्त,ठाणे यांनी गांभिर्याने दखल घेवून, पुढील ठोस कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे, पो.शि./ ३८१६ आकाश सोपान सुर्वे आणि बडतर्फ पो.शि./१०१८ हर्षद लक्ष्मण परब यांना दिनांक ०३/०५/२०२५ रोजी सेवेतून ‘बडतर्फ’ करण्यात आले आहे.

वरिल गैरप्रकाराबाबत श्री प्रकाश तुकाराम वारके, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस स्टेशन, ठाणे यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरून, दि. ५/५/२०२५ रोजी सायबर पोलीस स्टेशन, ठाणे येथे गु.रजि.क्र. ३/२०२५, भा.न्या.सं.कलम ३०३(२), ३१४, ३१६ (५) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ४६, ६६, ७२ प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास गुन्हे शाखा घटक-१ ठाणेकडून करण्यात येत आहे.

प्रस्तुत गुन्हयात, आरोपी - **१) बडतर्फ पो.शि./ ३८१६ आकाश सोपान सुर्वे, वय ३६ वर्षे, पत्ता - एस.एस. २, रूम नं. १६३, विठ्ठल मंदिरा जवळ, सेक्टर नं. ०४, कोपर खैराणे, नवी मुंबई** आणि २) **बडतर्फ पो.शि./१०१८ हर्षद लक्ष्मण परब, वय ३१ वर्षे, पत्ता - घर नं. ५९२, परब वाडी, न्यु इंग्लिश स्कुल जवळ, शिवाजी नगर, बेलापुर रोड, कळवा, ठाणे** आणि **खाजगी इसम ३) मोहम्मद सोहेल मोहम्मद शब्बीर राजपुत वय २८ वर्षे, पत्ता - शाहिन कॉटेज, सरस्वती विद्यालयाजवळ, आकाशगंगा रोड, दुसरी राबोडी, ठाणे** यांना दिनांक ०५/०५/२०२५ रोजी २१.५५ वा. अटक करण्यात आली असून, मा.न्यायालयाने त्यांची दिनांक ११/०५/२०२५ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केली असून पुढील तपास चालु आहे.

---ooo---